महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission
मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२७९५९०० फॅक्स : २२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५
ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

क्रमांक - पी १(२) (२) /एप्रिल-२०१४/एक दिनांक :- ५ एप्रिल, २०१७

महाराष्ट्र लोकसेवा आयोग
अधिसंख्य सहायक जिल्हाधिकारी, परिवीक्षाधीन उप जिल्हाधिकारी व परिवीक्षाधीन तहसीलदार / नायब तहसीलदार(एप्रिल-२०१४)

**शुध्दिपत्रक**

आयोगामार्फत दिनांक २ ते ४ जून, २०१६ या कालावधीत मुंबई येथे **अधिसंख्य सहायक जिल्हाधिकारी, परिवीक्षाधीन उप जिल्हाधिकारी व परिवीक्षाधीन तहसीलदार / नायब तहसीलदार (एप्रिल-२०१४) विभागीय परीक्षा** घेण्यात आली होती. सदर विभागीय परीक्षेचा निकाल दिनांक २७ मार्च, २०१७ रोजी जाहीर करण्यात आला आहे. त्यावेळी विभागीय परीक्षांचे निकाल घोषित झाल्यानंतर ज्या उमेदवारांस गुणांची पडताळणी करून घ्यावयाची असल्यास त्यांनी निकालाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत विभागप्रमुखांकडे अर्ज पाठविणे आवश्यक असल्याचे घोषित करण्यात आले आहे. तथापि काही प्रशासकीय कारणास्तव उमेदवारांना गुणपडताळणीसाठी दिलेला एक महिन्याचा कालावधी कमी करण्यात येत असून ज्या उमेदवारांना त्यांच्या गुणांची पडताळणी करावयाची आहे. अशा उमेदवारांनी त्यांचे अर्ज दिनांक १२ एप्रिल, २०१७ पर्यंत विहित शुल्काच्या किंमतीच्या कोर्ट फी स्टॅम्पसह त्यांच्या विभागप्रमुखांकडे पाठविणे आवश्यक आहे व विभागप्रमुखांनी सदर अर्ज दिनांक १७ एप्रिल, २०१७ पर्यंत आयोगाच्या कार्यालयात पाठविणे आवश्यक आहे. उमेदवारांकडून विहित मुदतीत विहित शुल्कासह विभागप्रमुखांमार्फत न आलेल्या अर्जाचा आयोगाकडून विचार केला जाणार नाही.

सु. सं. केसरकर
उपसचिव(परीक्षा),
महाराष्ट्र लोकसेवा आयोग